राज्य शासकीय कर्मचारी समूह वैयक्तिक अपघात विमा योजनेच्या वर्गणीवर वस्तू व सेवा कर आकारणीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक:-विमादा-११२६/प्र.क्र.१९/विमा प्रशासन,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १३ मे,२०२६

**वाचा** :- १. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.६४/विमा प्रशासन, दिनांक २४.०१.२०२३.
२. भारत सरकार, वित्त मंत्रालय, अधिसूचना संख्या १६/२०२५ केन्द्रीय कर (दर), दिनांक १७.०९.२०२५.

**प्रस्तावना:-**

"राज्य शासकीय कर्मचारी समूह वैयक्तिक अपघात विमा योजना" ही दिनांक ०४.०२.२०१६ च्या शासन निर्णयान्वये दिनांक ०१.०४.२०१६ पासून लागू करण्यात आली असून, दिनांक १८.०२.२०१७ च्या शासन निर्णयान्वये पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेची व्याप्ती वेळोवेळी वाढविण्यात आली असून त्यामध्ये भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी, भारतीय वन सेवेतील अधिकारी तसेच राज्यातील शासकीय विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील विविध घटकांचा (अधिकारी/कर्मचारी) समावेश करण्यात आला आहे. तसेच, दिनांक २४.०१.२०२३ च्या शासन निर्णयान्वये दिनांक ०१.०४.२०२३ पासून सुधारित वर्गणी निर्धारीत करण्यात आली असून त्यावर वस्तू व सेवा कर (GST) लागू आहे.

२. भारत सरकार, वित्त मंत्रालय यांच्या दिनांक १७.०९.२०२५ रोजीच्या अधिसूचनेन्वये केन्द्रीय वस्तू व सेवा कर (GST) अधिनियम, २०१७ नुसार प्रदान अधिकारी व जीएसटी परिषद यांनी केलेल्या शिफारशीनुसार जीवन विमा व अपघात विमा यांच्यावरील वस्तू व सेवा कर (GST) रद्द करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने राज्य शासकीय कर्मचारी समूह वैयक्तिक अपघात विमा योजनेच्या वर्गणीवर वस्तू व सेवा कर लागू राहील किंवा कसे याबाबत स्पष्टता देण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती. महाराष्ट्र राज्य वस्तू व सेवा कर विभाग यांचे अभिप्राय विचारात घेऊन याबाबत खालीलप्रमाणे स्पष्टीकरण देण्यात येत आहे.

**परिपत्रक :-**

दिनांक ०३.०९.२०२५ रोजी झालेल्या ५६ व्या वस्तू व सेवा कर परिषदेच्या बैठकीत आरोग्य विमा व जीवन विमा यांना वस्तू व सेवा करमाफीची शिफारस करण्यात आली आहे. त्यानुसार, आरोग्य विम्यासाठी सर्व वैयक्तिक आरोग्य विमा पॉलिसी (फॅमिली फ्लोटर योजना व ज्येष्ठ नागरिक पॉलिसींसह) तसेच जीवन विम्यासाठी सर्व वैयक्तिक जीवन विमा पॉलिसी (टर्म, युलिप (ULIP) व एन्डोमेंट योजना समाविष्ट) या करमाफीच्या कक्षेत येतात. परंतु सदर सूट कोणत्याही समूह विमा योजनेसाठी लागू केलेली नाही.

"राज्य शासकीय कर्मचारी समूह अपघात विमा योजना" ही समूह विमा योजना असल्याने, भारत सरकार,वित्त मंत्रालय, अधिसूचना क्र. १६/२०२५-केंद्रीय कर (दर) दि. १७/०९/२०२५ अन्वये सुधारणा केलेली नोंद क्र.३६C व ३६D नुसार वैयक्तिक विमा योजनेसाठी असणारी सूट ही समूह विमा योजनेसाठी लागू होत नाही. त्यामुळे राज्य शासकीय कर्मचारी समूह अपघात विमा योजनेस १८% इतका वस्तू व सेवा कर लागू होईल.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६०५१३१३१८४६११०५ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIVEK RAMBHAJI DAHIPHALE

Digitally signed by VIVEK RAMBHAJI DAHIPHALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT,
2.5.4.20=56142975484e58364afe88f5f0e3138e3ce0d4e4058e42f00
3dfd69500064afb, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=3981A50612646983D580DEA2DA5FB52A33D8E6E3
C4F34CD80F08C598711CEB65, cn=VIVEK RAMBHAJI DAHIPHALE
Date: 2026.05.13 13:19:33 +05'30'

**( वि. रं. दहिफळे )**
**सह सचिव , महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

संचालक, विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रत,**

१) मा.राज्यपालांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३) मा.वित्त मंत्री यांचे सचिव / प्रधान सचिव
४) सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
५) सर्व संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य
६) सर्व विधान मंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
७) महालेखापाल (लेखा परीक्षा)-१ महाराष्ट्र, मुंबई
८) महालेखापाल (लेखा परीक्षा)-२ महाराष्ट्र, नागपूर
९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१ महाराष्ट्र, मुंबई
१०) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२ महाराष्ट्र, नागपूर
११) महालेखापाल (लेखा परीक्षा-३), महाराष्ट्र, मुंबई
१२) महालेखापाल, स्थानिक संस्था, लेखापरीक्षा व लेखे, मुंबई
१३) वरिष्ठ महालेखापाल, स्थानिक संस्था (लेखा परीक्षा व लेखे), नागपूर
१४) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१५) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१६) अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१७) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१८) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१९) सर्व उप कोषागार अधिकारी

२०) मंत्रालयातील सर्व प्रशासकीय विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
२१) मंत्रालयातील सर्व विभाग,
२२) मंत्रालयातील सर्व विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख.
२३) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई
२४) सचिव, राज्य निवडणूक आयोग,मुंबई
२५) *प्रबंधक, उच्च न्यायालय, (मूळ शाखा,) मुंबई
२६) *प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपील शाखा), मुंबई
२७) *प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
२८) *प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई
२९) सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई
३०) सदस्य सचिव, राज्य महिला आयोग, मुंबई
३१) महासंचालक, यशदा, पुणे
३२) *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
३३) प्र.कुलसचिव, सर्व विद्यापीठे / कृषी विद्यापीठे / इतर विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
३४) वित्त विभागातील सर्व कार्यासने
३५) जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई
३६) बहुजन समाज पार्टी १, इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई - १
३७) भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ. बॅरेक नं-१ योगक्षेमसमोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई -२०.
३८) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी,३१४,राजभवन,एस.व्ही.पटेल रोड, मुंबई -४
३९) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस वरळी, मुंबई-१३
४०) इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई -२५
४१) राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री-प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई-२१.
४२) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चाळ, दादर, मुंबई -२८.
४३) निवड नस्ती, विमा प्रशासन कार्यासन, वित्त विभाग

*पत्राद्वारे.